(असाधारण)

शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२०

अधिसूचना

क्रमांक : ३६/२०२० दिनांक : १३/३/२०२०

विषय :- स्थानिक सुट्टया,२०२०

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आणि विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील तसेच मॉडेल डिग्री कॉलेज,बुलढाणा येथील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सन २०२० वर्षातील स्थानिक सुट्टया खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

स्थानिक सुट्टया :

अ.क्र.	सुट्टीचा दिवस	दिनांक	वार
१.	(नारळी पोर्णिमा) रक्षाबंधन	०३.०८.२०२०	सोमवार
२.	जेष्ठागौरी पूजन	२६.०८.२०२०	बुधवार
३.	सर्वपित्री दर्श अमावस्या	१७.०९.२०२०	गुरूवार

टिप :-

१) सर्व संलग्नित महाविद्यालयातील आणि विद्यापीठाचे स्नातकोत्तर शैक्षणिक विभागातील तसेच मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा येथील शैक्षणिक कर्मचाऱ्यांना (ॲकॅडेमिक स्टाफ) फक्त शैक्षणिक नियामके (ॲकॅडेमिक कॅलेंडर) प्रमाणे सुट्या राहतील.

२) ज्या दिवशी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुटी असेल,परंतु शैक्षणिक विभागाला सुटी नसेल त्या दिवशी प्राचार्य/विभाग प्रमुख,हे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याकरिता सूचना देतील व त्याकरिता इतर दिवशी पर्यायी रजा मंजूर करतील,म्हणजे शैक्षणिक कामामध्ये येणाऱ्या अडचणी टाळता येतील.

३) सदर स्थानिक सुट्या विद्यापीठ परिक्षेत्रातील, अमरावती अकोला,यवतमाळ,बुलढाणा व वाशिम या जिल्हयांतील सर्व संलग्नित/संचालित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत असल्याने अमरावती जिल्हा वगळून इतर जिल्हयांमधील संलग्नित/संचालित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना संबधित जिल्हयांत जाहीर होणाऱ्या स्थानिक सुट्या लागू राहणार नाहीत.

स्वा/-

आदेशान्वये ï

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

*****

अधिसूचना

क्रमांक : ३७/२०२०. **दिनांक : १३.०३.२०२०**

विषय :- यु.जी. (कॉम्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग.) पी.जी. (केमिकल इंजीनिअरिंग, सीव्हील स्ट्रक्चरल इंजीनिअरिंग) हे अभ्यासक्रम द्वितीय पाळीतुन प्रथम पाळीत रुपांतरण करण्याबाबत तसेच वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० वरुन ४० करण्याबाबत...

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.टीईएम-२०१८ प्र.क्र. २१३/तांशि-४ /२०१९, दि.५ जुलै, २०१९ अन्वये खालील महाविद्यालयातील यु.जी. (कॉम्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग.) पी.जी. (केमिकल इंजीनिअरिंग, सीव्हील (स्ट्रक्चरल इंजीनिअरिंग) हे अभ्यासक्रम द्वितीय पाळीतुन प्रथम पाळीत रुपांतरण करण्यास व शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९प्र.क्र.२११/तांशि-४/२०१९,दि.५जुलै,२०१९ अन्वये खालील महाविद्यालयास वास्तुशास्त्र पदवी या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० वरुन ४० करण्यास कायम विना अनुदान तत्वावर व इतर नेहमीच्या अटीं व शर्तीच्या अधिन राहुन सत्र २०१९ -२०२० पासुन परवानगी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या महाविद्यालयाचा चौकशी समिती अहवाल दि.१३.१.२०२० रोजी झालेल्या विद्या परिषदेने विषय क्र. १० अन्वये मान्य केल्यानुसार, स्तंभ क्र. २ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयास स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या विषय/अभ्यासक्रमाचे रुपांतरण व वास्तुशास्त्र पदवी अभ्यास्क्रमाची प्रवेशक्षमता वाढीस सत्र २०१९-२० पासुन महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन **रुपांतरण/संलग्निकरण** प्रदान करण्यात येत आहे.

TABLE

Sr. No.	Name of the College	Subject(s)/Courses(s)/intake Capacity	Conversion
1	2	3	4
1.	College of Engineerin & Technology, Akola.	B.E. Computer Science and Engineering. (With 60 Intake Capacity)	सत्र २०१९-२० पासुन सदर अभ्यासक्रमाला द्वितीय पाळीतुन प्रथम पाळीत रुपांतरण करण्यात येत आहे.
		M.Tech. Chemical Engineering (With 18 Intake Capacity)	
		M. E.Civil (Structure Engineering) (With 18 Intake Capacity)	
2.		B. Arch :- Increase in Intake Capacity 30 to 40 For the Session 2019-20	

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ